पुण्य नगरी

# नवीन कायदे होणार उद्योगवाढीचे भागीदार : अक्षत खेतान

**नागपूर :** भारतात व्यवसाय सुलभता, एमएसएमई सक्षमीकरण व गुंतवणूक वाढविण्यासाठी व्यापक कायदेशीर सुधारणा वेगाने राबविण्यात येत आहेत. 'भारताचा कायदेशीर परिदृश्य : व्यवसाय सुलभता आणि एमएसएमई पुनरुज्जीवन' या विषयावर आयोजित पत्रकार परिषदेत एयू कॉर्पोरेट ॲडव्हायझरी ॲण्ड लीगल सर्व्हिसेसचे संस्थापक अक्षत खेतान यांनी या सुधारांचा उद्योगक्षेत्रावर होणारा सकारात्मक परिणाम स्पष्ट केला. खेतान म्हणाले , नवीन कायदे आता अडथळा न ठरता उद्योगांच्या वाढीचे भागीदार होत आहेत. पारदर्शक, स्थिर व उद्योजक-मित्र कायदेशीर व्यवस्था हीच भारताच्या आर्थिक प्रगतीची पुढची वाट आहे. त्यांनी एमएसएमई




क्षेत्राला बळकटी देण्यासाठी करण्यात आलेल्या उपायांवरही भाष्य केले. देयकांची वेळेवर अंमलबजावणी, एमएसएमई फॅसिलिटेशन कौन्सिल्सची वाढती कार्यक्षमता व आयबीसी अंतर्गत पीपीआयआरपी प्रक्रियेने लघुउद्योगांना नवजीवन मिळत असल्याचे त्यांनी सांगितले. यामुळे केवळ व्यवसाय पुनरुज्जीवनच वेगवान होत नाही, तर विलीनीकरण-अधिग्रहण व्यवहारांसाठीही अनुकूल वातावरण तयार होत आहे. आयबीसी लागू झाल्यापासून कर्जवसुली व व्यवसाय पुनर्रचना अधिक कार्यक्षम झाली असून गुंतवणूकदारांचा विश्वास वाढल्याचे त्यांनी नमूद केले. डिजिटल न्यायव्यवस्था, ई-फाइलिंग व ऑनलाइन सुनावणीमुळे वादांचे निराकरण अधिक वेगाने होत असल्यामुळे उद्योग आणि एमएसएमई दोघांनाही मोठा दिलासा मिळत आहे. भारत १०० च्या दिशेने वाटचाल करताना उद्योगांना आधार देणारे आणि विकासाला चालना देणारे कायदे हेच देशाच्या भविष्यातील आर्थिक कणा ठरणार आहेत, असे शेवटी खेतान यांनी सांगितले.

Nagpur Edition
Nov 27, 2025 Page No. 02
Powered by: erelego.com